# महाराष्ट्र विधानपरिषद

## द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२४

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कसाल पोलीस दूरक्षेत्र पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(१) १०१८७ (२२-११-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस दलातील कर्मचारी कमतरतेमुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कसाल पोलीस दूरक्षेत्र सद्य:स्थितीत बंद अवस्थेत असल्याचे दिनांक २१ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कसाल पोलीस दूरक्षेत्र पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) व (२) कोविड-१९ प्रादुर्भाव कालावधीमधील बंदोबस्त, कन्टेन्टमेंट झोन, नाकाबंदी फिक्स पॉईंट पेट्रोलींग, लॉकडाऊन बंदोबस्त व इतर बंदोबस्त कामकाजामुळे कसाल पोलीस दुरक्षेत्र येथे पोलीस अंमलदाराची नेमणूक करणे शक्य होत नव्हते. तथापि, सद्यःस्थितीत कसाल पोलीस दुरक्षेत्र येथे २ पोलीस अंमलदाराची नेमणूक करण्यात आली असून दुरक्षेत्रामधील दैनंदिन कामकाज सुरळीत सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महावितरण कंपनीच्या विभागवार उपकंपन्या तयार करण्याबाबत

**(२) ११२१० (१९-११-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनी कायम ठेवुन तिच्या विभागवार उपकंपन्या तयार कराव्यात, अशा प्रकारचा प्रस्ताव ऊर्जा विभागाकडून शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीसाठीच्या वीजदेयकांची थकबाकी, पथदिव्यांची वीज देयके यासाठी शासनाने महावितरणला अर्थसंकल्पात तरतुद करून देण्यात यावी, असाही प्रस्ताव ऊर्जा विभागाकडून वित्त विभागाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पात तरतूद करून शेतीसाठीची वीज देयके व पथदिव्यांची विज देयके अदा करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०१-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व "क" वर्ग नगरपरिषद व नगरपंचायत यांच्या सार्वजनिक पथदिवे व पाणीपुरवठा योजनांच्या वीज देयकांच्या थकबाकी वसुलीकरीता One Time Settlement या योजनेस शासन निर्णय दिनांक ०९/०१/२०२३ नुसार मान्यता देण्यात आली आहे. यानुसार, ग्रामविकास विभाग व नगरविकास विभाग यांनी अतिरिक्त पुरवणी मागणीव्दारे अर्थसंकल्पीय तरतूद करुन महावितरण कंपनीस थकबाकी अदा करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) One Time Settlement या योजनेंतर्गत ग्रामविकास विभागाव्दारे या पोटी रुपये ३३९१ कोटी निधी महावितरणला उपलब्ध केला असून, नगरविकास विभागाव्दारे रुपये १८६ कोटी इतक्या रक्कमेची पुरवणी मागणी मंजूर करण्यात आली असून, महावितरण कंपनीस निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर पोलीस शिपाई भरती प्रकियेमध्ये खेळाचे बनावट प्रमाणपत्र सादर करुन भरती केल्याबाबत

**(३) १८८०४ (२३-०६-२०२३) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर पोलीस शिपाई मधील सन २०२१ मध्ये करण्यात आलेल्या भरतीमध्ये भ.ज (ब) खेळाडू या प्रवर्गातून निवड करण्यात आलेल्या श्रीमती सुनिका डवरी, चेस्ट क्र. ३१७२० या उमेदवाराने भरती प्रक्रियेदरम्यान बनावट प्रमाणपत्र सादर करुन शासनाची फसवणूक केली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उमेदवार सध्या पोलीस सेवेत कार्यरत असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संबंधित उमेदवारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) व (२) पुणे शहर पोलीस शिपाई भरती-२०२१ मध्ये श्री.सुनिल तानाजी डवरी, चेस्ट क्र. ३१७२० या उमेदवाराची सामाजीक व समांतर आरक्षणांतर्गत प्राप्त गुणांनुसार भ.ज.(ब)-खेळाडू या प्रवर्गातून निवड करण्यात आली आहे. सदर उमेदवाराने भरती

प्रक्रियेदरम्यान कागदपत्र पडताळणीवेळी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयाचा सॉफ्टबॉल या खेळाचा पडताळणी अहवाल सादर केला होता.सदर अहवाल पुनर्पडताळणीकरीता उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविला असता त्यांनी सदर अहवाल वैध असलेबाबत कळविले आहे.

प्रमाणपत्राच्या फेरपडताळणीतही श्री.डवरी यांचे प्रमाणपत्र वैध असल्याने त्यांच्याविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. मात्र, श्री.डवरी यांना अद्याप नियुक्ती आदेश देण्यात आलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोलीस शिपाई चालक पदासाठी राबविलेल्या भरती प्रक्रियेबाबत

**(४) १९०७२ (०४-०८-२०२३) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यांनी पोलीस शिपाई चालक पदासाठी राबविलेल्या भरती प्रक्रियेमध्ये सुधारित यादी जाहीर करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण किती उमेदवारांनी ३० नोव्हेंबर २०१९ च्या जाहिरातीद्वारे पोलीस शिपाई चालक पदाच्या भरतीसाठी अर्ज केले होते,

(३) असल्यास, एकूण किती उमेदवारांनी एक पेक्षा अधिक जिल्ह्याच्या पदाकरीता अर्ज केले होते,

(४) असल्यास, मा. न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे एकूण किती उमेदवारांची प्रत्यक्षात नियुक्ती करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२४) :** (१) पोलीस शिपाई चालक भरती-२०१९ मध्ये एकापेक्षा जास्त आवेदन अर्ज दाखल केल्या प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई यांनी दिनांक १७/०३/२०२३ रोजी दिलेल्या आदेशानुसार निवड्यादी सुधारीत करण्याबाबत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे स्तरावरुन संबंधित घटक कार्यालय प्रमुखांना सुचना देण्यात आल्या होत्या.

(२), (३) व (४) पोलीस शिपाई चालक भरती-२०१९ अंतर्गत पोलीस शिपाई चालक पदासाठी एकूण १३१२६२ उमेदवारांनी आवेदन अर्ज सादर केले होते त्यापैकी २८९७ उमेदवारांनी एकापेक्षा जास्त ठिकाणी आवेदन अर्ज सादर केले होते. तथापि, २८९७ उमेदवारांपैकी१५७ उमेदवार हे गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादीत समाविष्ट झालेले आहेत.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांच्या दिनांक ११/०४/२०२२ रोजीच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्र.५४०३/२०२३ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२/०६/२०२३ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सेवा समाप्त न करण्याचे आदेश दिलेले असल्याने अशा उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात आलेली नाही. तसेच प्रस्तुत

बाबींच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई, औरंगाबाद व नागपूर खंडपीठामध्ये दाखल झालेल्या विविध याचिका एकत्रितपणे मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर सुनावणीसाठी ठेवण्यात आल्या असून सद्य:स्थितीत सदरहू प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यात जिल्हा न्यायालय स्थापन करण्याबाबत

**(५) २१०३७ (०९-११-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात जिल्हा न्यायालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप आणि सद्य:स्थिती काय आहे,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात जिल्हा न्यायालय किती कालावधीत सुरु होणे अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०२४) :** (१) पालघर जिल्ह्यात जिल्हा न्यायालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप मा.उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त झालेला नाही.

मा.उच्च न्यायालयाने दिनांक २२/१/२०१६ रोजी पालघर येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व मुख्य न्यायदंडाधिकारी यांची न्यायालये स्थापन करण्यास तसेच पालघर हा न्यायिक जिल्हा निर्माण करण्यास मान्यता दिली आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे यांना न्यायालयासाठी इमारत व न्यायिक अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान यांची उपलब्धता तपासून प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाची इमारत व न्यायिक अधिकाऱ्यांसाठी निवासस्थानाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.
(२) पालघर जिल्ह्यात जिल्हा न्यायालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप मा.उच्च न्यायालयाकडून शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) अ.क्र.२ च्या अनुषंगाने प्रश्न उद्‌भवत नाही

---

## नॅक मुल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत

**(६) २१०५३ (०३-१२-२०२३) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १७०३२ ला दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०२३-२४ च्या प्रारंभ दिनांकापर्यंत, नॅक मुल्यांकन आणि पुनर्मुल्यांकन पूर्ण न केल्यास प्रथम वर्ष प्रक्रिया रोखण्याचा आदेश मा.उच्च शिक्षण संचालक यांनी यापुर्वीच दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन प्रक्रिया पार पाडलेली नाही, त्या महाविद्यालयांची संलग्नता रद्द करण्याचे आदेश मा.उच्च शिक्षण संचालकांनी त्याचवेळी दिले असल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च शिक्षण संचालकांचे आदेशाला विद्यापीठांनी प्रतिसाद न दिल्यामुळे शासनाने विद्यापीठांना महाविद्यालयांवरील कारवाईची माहिती सादर करण्यासाठी पुन्हा दिनांक ७ सप्टेंबर, २०२३ पर्यंत मुदतवाढ दिली असल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नव्याने दिलेल्या मुतदवाढीपर्यंत वा त्यानंतरही सदरचा तपशिल सादर न करणाऱ्या विद्यापीठांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१३-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
दिनांक १२ सप्टेंबर, २०२३ रोजी मा.मंत्री (उ.व तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विद्यापीठनिहाय आढावा बैठकीमध्ये सर्व अकृषी विद्यापीठांनी यासंदर्भातील तपशील सादर केला होता.

---

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) २११०४ (०३-१२-२०२३) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित व विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुमारे ६० हजार पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ अखेर निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत असल्यामुळे याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने जनसामान्यांमध्ये असंतोष पसरला असून सदरची रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१३-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुमारे ३२,००० पदे रिक्त आहेत.
(२) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०१७ मधील प्राप्त गुणाकनानुसार प्रसिध्द झालेल्या यादीतील अपात्र, गैरहजर व रुजू न झालेल्या उमेदवारांमुळे रिक्त राहिलेली पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
तसेच स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत चालविलेल्या जाणाऱ्या शाळांतील रिक्त पदे भरण्यासाठी आरक्षण व विषय नोंद करुन जाहिरात देण्याची सुविधा पवित्र पोर्टलवर दिनांक १६/१०/२०२३ पासून देण्यात आलेली आहे. शिक्षक आंतरजिल्हा बदलीचा ६ वा टप्पा पूर्ण होताच, पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या जाहीरातीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२, मध्ये उमेदवारास प्राप्त गुणांकन व दिलेला प्राधान्यक्रम विचारात घेऊन, उमेदवारांची शिफारस करण्यात येणार आहे.

तसेच पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्त शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही

---

## तेल्हारा (जि.अकोला) कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना पकडल्याबाबत

**(८) २१५०४ (०३-१२-२०२३) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तेल्हारा (जि.अकोला) कृषी उत्पन्न बाजार समिती येथे मागील हंगामात आधारभूत किंमत योजनेंतर्गत शेतीमाल खरेदीसाठी करण्यात आलेल्या हमाल पुरवठ्यासंदर्भातील रुपये १४ लाख ३९ हजार ५९२ एवढी रक्कम बाजार समितीकडून पुरवठादारास देय होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाजार समितीकडून पुरवठादारास रुपये ४ लाख ९३ हजार अदा करण्यात येऊन उर्वरित रूपये ९ लाख ४६ हजार ५९२ देणेसाठी तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व उपसभापती यांनी पुरवठादाराकडे १ लाख रुपयांची मागणी केल्याने सदर पुरवठादाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ रोजी तेल्हारा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती यांना तक्रारदाराकडून एक लाख रुपये लाच स्वीकारतांना रंगेहाथ पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०८-१२-२०२३) :** (१), (२), (३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणात लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत अकोला येथील अपराध क्र.३२२/२०२३, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ नुसार दिनांक २५/०९/२०२३ नुसार गुन्हा नोंद करण्यात आलेला असून त्याबाबत तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्यातील रस्ते बांधकामांची रक्कम वसूल होवून सुध्दा टोल वसुली सुरु असल्याबाबत

**(९) २१५३० (०३-१२-२०२३) श्री.अंबादास दानवे, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्ते बांधकामासाठी करण्यात येणाऱ्या खर्चाची वसुली करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या टोलनाक्यांमधून माहे सप्टेंबर, २०२३ पर्यंत किती रक्कम जमा करण्यात आली, त्यातुन किती खर्चाची रक्कम वसुल करण्यात आली याची कोणतीही माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा राज्य रस्ते विकास महामंडळाने अद्यापपर्यंत जाहीर केली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत रस्ते बांधण्यासाठी रुपये ५००० कोटी खर्च करण्यात आले असताना या रस्त्यांवरील टोल मधून सन २००२ ते सप्टेंबर, २०२३ पर्यंत या २२ वर्षात रुपये २२००० कोटी टोल कंपन्यांना टोल मधून प्राप्त झाले असून सुध्दा टोलनाके सुरु आहेत, तसेच शासनाने बंद पडलेले १२ टोलनाके जिथे छोट्या वाहनांना ज्या टोलनाक्यांवर टोलमाफी देण्यात आली अशा ५३ टोलच्या कंत्राटदारांना नुकसान भरपाई म्हणून सन २०१६ मध्ये रुपये ७९८ कोटी देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सरकारने सन २०१५ मध्ये ५३ टोलनाके बंद करून २६ टोल नाके सुरू ठेवले त्यानुसार एक्सप्रेस वे-वरील टोलनाक्यांमधून माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये रुपये ११८ कोटी १८ लाख ४९ हजार ९१९ तर माहे जुलै, २०२३ मध्ये रुपये १११ कोटी ९८ लाख १५ हजार ७३१ इतकी रुपयांची वसुली वाहनधारकांकडून टोलद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग व राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे सुरु करण्यात आलेल्या टोल नाक्यांमधून खर्चाची किती रक्कम वसूल झाली, संपूर्ण खर्चाची रक्कम वसुल झाली असल्यास असे टोल नाके बंद करण्याबाबत किंवा छोट्या वाहनांना टोलमाफी देऊन इतर वाहनांबाबत वसुल करण्यात येणाऱ्या टोलची रक्कम कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१४-१२-२०२३) :** (१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्गत एकूण १० प्रकल्पांवर पथकर वसुली प्रगतीत आहे. www.msrdc.in या संकेतस्थळावर पथकर वसुली माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. प्रमुख प्रकल्पांबाबत, प्रकल्पावरील खर्च, आतापर्यंतची पथकर वसुली, शिल्लक पथकर वसुली याबाबतची माहिती इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डद्वारे देखील प्रदर्शित केली जाते.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत एकूण १४ प्रकल्पांवर पथकर वसुली प्रगतीत आहे. खाजगीकरणांतर्गत प्रकल्पाची माहिती www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच पथकर स्थानकांवर सदर माहिती प्रदर्शित करण्याकरीता इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डची सुविधा आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ३८ पथकर स्थानकांपैकी ११ पथकर स्थानके व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचेकडील ५३ पथकर स्थानकांपैकी १ पथकर स्थानक अशी एकूण १२ पथकर स्थानके दिनांक ३१ मे, २०१५ रोजी मध्यरात्री १२.०० वा. बंद करण्यात आली आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील उर्वरित २७ पथकर स्थानके व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील २६ पथकर स्थानके अशा एकूण ५३ पथकर स्थानकांवर कार, जीप व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांच्या बसेसना दिनांक ३१ मे, २०१५ रोजी मध्यरात्री १२.०० वा. नंतर पथकरातून सूट देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत १० व सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १४ प्रकल्पांवर पथकर वसुली प्रगतीत आहे.
सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षात कार, जीप व एस.टी. बसेसना सूट दिल्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाअंतर्गत प्रकल्पांमध्ये रक्कम रुपये ७९.०६ कोटी व सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रकल्पांमध्ये रक्कम रुपये ३९७.९१ कोटी इतकी नुकसान भरपाई उपलब्ध नियतव्ययानुसार देण्यात आली आहे.
(३) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गा वरील पथकर स्थानकांवर कंत्राटदारामार्फत सादर करण्यात आलेली पथकर वसुली माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये रुपये ११८ कोटी १८ लाख ४९ हजार ९१९, तसेच माहे जुलै, २०२३ मध्ये रुपये १११ कोटी ९८ लाख १५ हजार ९७८ इतकी आहे.
(४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत प्रकल्पांमध्ये करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे सवलत कालावधी संपुष्टात आलेला नसल्याने सद्य:स्थितीत १० प्रकल्पावरील पथकर वसुली प्रगतीत आहे. यापैकी ६ पथकर स्थानकांवर कार, जीप, एस.टी. बसेसना पथकरातून सूट देण्यात आली आहे.
सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत खाजगीकरणाच्या प्रकल्पांतर्गत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे सवलत कालावधी संपुष्टात आलेला नसल्याने सद्य:स्थितीत १४ प्रकल्पावरील पथकर वसुली प्रगतीत आहे. सदर पथकर स्थानकांवर कार, जीप, एस.टी. बसेसना पथकरातून सूट देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अल्पसंख्यांक समाजातील महिलांना पतपुरवठ्याची संधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१०) २१७४६ (०३-१२-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या महिलांसाठी स्वयंसहायता बचत गट योजना तसेच अल्पसंख्याक बहुलक्षेत्रातील १२ शहरांमधील मुस्लिम, जैन, बौध्द, ख्रिश्चन,शीख पारशी आणि ज्यू या अल्पसंख्याक समाजातील महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून सक्षम बनविण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळातील अल्पसंख्याक महिलांचे स्वयंसहायता बचत गट स्थापन केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्याक समाजाच्या महिलांना संघटित करून त्यांना पतपुरवठ्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी केवळ १२ शहरे असल्याने अनेक जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजातील महिला बचत गट वंचित राहत आहेत तसेच सोलापूर शहरातही मोठ्या प्रमाणात अल्पसंख्याक समाज असूनही तेथील महिला बचत गटांचा समावेश करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत आठ वर्षांमध्ये २४०० बचत गट निर्मितीचे उद्दिष्ट होते ते पूर्ण झाल्याने आणखी ८०० बचत गटांना शासनाने सन २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक प्रवर्गातील शहरनिहाय स्थापित केलेल्या बचत गटांची संख्या किती आहे तसेच एका बचत गटाला किती अनुदान आणि भाग भांडवल देण्यात येते व त्याचा प्रारूप आराखडा तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर शहराप्रमाणे तसेच राज्यातील अनेक शहरात राहत असलेल्या अल्पसंख्याक समाजातील महिला बचत गटांना पतपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच बचत गटाला अनुदान भागभांडवल देण्यासाठी तयार केलेल्या प्रारुप आराखड्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे ?

**श्री.अब्दुल सत्तार (१२-१२-२०२३) :** (१), (२) व (३) अल्पसंख्याक महिलांना संघटीत करून त्यांचा आर्थिक विकास व्हावा याकरीता शासन निर्णय दिनांक २८/०२/२०१२ अन्वये स्वयंसहायता बचतगट योजना राबविण्यात येत आहे. सदर योजना राज्यातील अल्पसंख्याक बहुल १२ शहरांमध्ये राबविण्यात येत असून या योजनेस शासन निर्णय दिनांक १/१०/२०२० अन्वये दिनांक ३१/०३/२०२५ पर्यंत मुदतवाढ देऊन ८०० बचतगटांचे उद्दिष्टे दिले आहे. तसेच विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र जलद विकास कार्यक्रमांतर्गत या महसुली विभागातील १५ जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्याक महिलांचे बचतगट करण्याकरीता शासन निर्णय दिनांक ७/०८/२०१९ अन्वये देखील योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा विस्तार करून राज्यातील उर्वरित सर्व जिल्ह्यात सदर योजना राबविण्यात येणार असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) सप्टेंबर, २०२३ अखेर मुंबई (मुंबई शहर व मुंबई उपनगर) जिल्हा- ६२४, ठाणे (भिवंडी-कौसा मुंब्रा)-८०७, पुणे-३५१, सांगली-३३५, छत्रपती संभाजी नगर-४१५, परभणी-३६८, नांदेड-३५५, वाशिम-३६४, नागपूर-४४६, नाशिक (मालेगाव)-४३० असे एकूण ४४९५ बचतगट १२ शहरात निर्माण केलेली आहेत. या बचतगटांना बँकेतून कर्ज पुरवठा उपलब्ध होण्याकरीता महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत सहायता करण्यात येते.

---

## रायगड मधील मराठी शाळांच्या पटसंख्येमध्ये घट झाली असल्याबाबत

**(११) २१८१० (२२-११-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी संख्येत झपाट्याने घट होत असून सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात १ हजार ६९ शाळांची पटसंख्या २० पेक्षा कमी झाली असून डिजिटल स्कूल, सेमी इंग्रजी शाळांची संख्या वाढविण्याकरीता घरोघरी जाऊन विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी केलेले प्रयत्न, मोफत गणवेश, शालेय पोषण आहार यासह विविध योजना राबवूनही जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश घेत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी होत चालली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने इंग्रजी शाळांचे वाढते प्रमाण रोखण्याकरीता तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०८-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे. रायगड जिल्ह्यामधून रोजगारासाठी नजीकच्या मुंबई, पुणे जिल्ह्यामध्ये पालकांचे स्थलांतर होत असल्यामुळे विद्यार्थी प्रवेशाचे प्रमाण कमी होत आहे. तसेच पनवेल, कर्जत, उरण, खालापूर, पेण, अलिबाग, महाड, माणगाव या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात शहरीकरण होत असल्यामुळे पालकांचा ओढा इंग्रजी माध्यमाकडे दिसून येतो ही वस्तुस्थिती आहे.
(३) रायगड जिल्ह्यामध्ये सर्व १ ली ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश देण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांना शासनामार्फत क्रीडा साहित्य/ ओपन जिमचे साहित्य देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे शाळांना सायन्स लॅब व नाविन्यपूर्ण विज्ञान केंद्र पुरविली जात आहेत.

पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे ओढा असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळांमधून सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात येत आहेत. जिल्हा नियोजन समिती व जिल्हा परिषद सेस तसेच अशासकीय सामाजिक संस्थांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळांची दुरुस्ती केली जाते.

जिल्हा परिषदेच्या सर्व विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची फी जिल्हा परिषद सेस मधुन भरण्यात येत आहे. जिल्हा नियोजन समिती व जिल्हा परिषद सेस या माध्यामातून भौतिक सुविधांची पुर्तता करण्यात येत आहे. जिल्ह्यामध्ये हस्ताक्षर उपक्रम, रोबोटिक्स, कोडिंग लॅब, त्याचप्रमाणे शाळांना पॉलिमर दप्तरालय जिल्हा नियोजन समिती मधून पुरविले जात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव शहरातील रस्त्याच्या कामामध्ये निधीचा अपव्यय होत असल्याबाबत

**(१२) २१८५५ (२८-११-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहरातील टॉवर चौक ते बालाजी चौकापर्यंतच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम माहे डिसेंबर, २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले असतानाही शासनाकडून मंजूर झालेल्या रुपये ८५ कोटींच्या निधीतून सदर रस्त्याच्या पूर्ण झालेल्या डांबरीकरणाच्या कामाला पुन्हा मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यासाठी पुन्हा मंजूर झालेल्या निधीचा अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याच्या पूर्ण झालेल्या डांबरीकरणाच्या कामाला पुन्हा मंजूरी देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१४-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) बाभोंरी निमखेडी जळगांव आसोदा भादली रस्ता प्रजिमा दर्जाचा आहे. सदर रस्त्यावर सा.क्र. कि.मी. ८/०० ते ११/५०० या लांबीत रस्ता कॉंक्रीटीकरण व सुधारणा करण्याचे रक्कम रुपये १२ कोटीचे काम मंजूर असून सद्य:स्थितीत निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

सदर ३.५० कि.मी. लांबीत ५०० मीटर लांबीत डांबरीकरणाचे काम महानगरपालिके मार्फत पूर्ण करण्यात आले असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रस्तावित कामात हा वाव समाविष्ट नाही,असे अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, जळगांव यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक भरती करण्याकरीता संगणकीय प्रणालीवरील (पवित्र पोर्टल) अडचणी दूर करण्याबाबत

**(१३) २२१७० (०३-१२-२०२३) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये शिक्षक भरतीसाठी अभियोग्यता चाचणी घेण्यात आली असून त्यापैकी २ लाख १६ हजार ४४३ उमेदवारांनी प्रत्यक्ष चाचणी दिली होती, ही चाचणी दिलेल्या उमेदवारांना स्व-प्रमाणपत्र पूर्ण करण्यासाठी १५ सप्टेंबर,२०२३ पर्यंत मुदत देण्यात आली होती परंतु काही भागात इंटरनेट सुविधा व्यवस्थितरित्या सुरु नसल्याने अनेक उमेदवार स्व-प्रमाणपत्र मुदतीत पूर्ण करु शकले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंटरनेटच्या अडचणी असल्यामुळे पवित्र पोर्टल सुरु होण्यास अडचणी येत असणे तसेच सीजीपी फार्म्युला प्रत्येक विद्यापीठाचा वेगवेगळा असल्याने त्याबाबतही उमेदवारांना अडचणी येत असणे, स्व-प्रमाणपत्रासाठीची हँग होते यामुळे कागदपत्रे अपलोड होत नसल्याने उमेदवारांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पवित्र व संगणकीय प्रणालीवर येणाऱ्या इंटरनेट अडचणी दूर करण्याबाबत तसेच अभियोग्यता चाचणी दिलेल्या उमेदवारांची शिक्षक पद भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याप्रकरणी विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१३-१२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी, २०२२ करीता प्रविष्ट उमेदवारांकडून स्व-प्रमाणपत्र पूर्ण करण्यासाठी दिनांक ०१/०९/२०२३ ते दिनांक १५/०९/२०२३ पर्यंत सुविधा देण्यात आली होती. तथापि, राज्याच्या काही भागात इंटरनेट सेवा विस्कळीत असल्याने, दिनांक २२/०९/२०२३ पर्यंत मुदतवाढ दिली होती. तद्नंतर न्यायालयीन प्रकरणामुळे सदर मुदत दिनांक ३०/०९/२०२३ पर्यंत वाढविण्यात आली होती. या कालावधीत १,६२,५६२ उमेदवारांनी स्वप्रमाणपत्र पूर्ण केले आहे. यासंदर्भात कोणत्याही उमेदवाराकडून तक्रार झालेली नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

पोर्टलवर उमेदवारांना स्वप्रमाणपत्र पूर्ण करण्यासाठी पदवी व पदव्युत्तर पदवीसाठी सिजीपीए/एसपीजीए गुणांच्या नोंदीबाबत उमेदवारांनी त्या-त्या विद्यापीठाकडे संपर्क साधून आवश्यक त्या गुणांची नोंद करण्याबाबत दिनांक १८/०९/२०२३ रोजी पोर्टलवर सूचना देण्यात आल्या होत्या.

स्व-प्रमाणपत्र भरताना उमेदवारांना येत असलेल्या अडचणींबाबत ई-मेल आयडी वर संपर्क करण्याबाबत सूचित केले होते. त्यानुसार प्राप्त तक्रारींबाबत स्व-प्रमाणपत्र पूर्ण करण्याच्या कालावधीत योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्था यांच्यामार्फत चालविलेल्या जाणाऱ्या शाळांतील रिक्त पदे भरण्यासाठी आरक्षण व विषय नोंद करुन जाहिरात देण्याची सुविधा पवित्र पोर्टलवर दिनांक १६/१०/२०२३ पासून देण्यात आलेली आहे. शिक्षक आंतरजिल्हा बदलीचा ६ वा टप्पा पूर्ण होताच, पोर्टलवर प्राप्त होणाऱ्या जाहीरातीनुसार शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२, मध्ये उमेदवारास प्राप्त गुणांकन व दिलेला प्राधान्यक्रम विचारात घेऊन, उमेदवारांची शिफारस करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि. रायगड) तालुक्यातील १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालयाच्या उभारणीबाबत

**(१४) २२३९६ (०६-१२-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील विशेषतः उरण (जि.रायगड) तालुक्यातील नागरिकांसाठी १०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय व्हावे याकरीता सन २०१० पासून विविध पक्षांच्या प्रतिनिधींकडून वारंवार मागणी होत असल्याने सन २०११ मध्ये उरण तालुक्यात १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्याची शासनाने घोषणा केली असून त्यासाठी सिडकोने १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयासाठी सिडकोच्या माध्यमातून उरण–पनवेल मार्गावर वायु विद्युत केंद्राच्या कामगार वसाहतीशेजारी भूखंड देण्यात आला असून ५७ कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला असून, सार्वजनिक बांधकाम मंत्री, सिडको आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी बैठक घेऊन रुग्णालयाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.रविंद्र चव्हाण (१२-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

उरण जिल्हा रायगड येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व अधिकारी / कर्मचारी यांचे निवासस्थान बांधकामाच्या रुपये ५७.५१ कोटी रकमेस सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर कामास सिडकोने रुपये १०० कोटी निधी मंजूर केलेला नसून प्रस्तुत काम सी.एस.आर. निधीतून करून घेण्यास मान्यता देण्यात आली होती.

(२) अंशत:खरे आहे.

सिडकोमार्फत प्रस्तावित रुग्णालयासाठी मौजे द्रोणागिरी ता.उरण जि.रायगड येथील प्लॉट क्र. १, से. १५ ए ही जागा सार्वजनिक आरोग्य विभागास दिनांक १७ मे, २०२३ रोजी भाडे पट्टा कराराने ताब्यात देण्यात आली आहे. तथापी सिडकोमार्फत रुपये ५७ कोटीचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आलेला नाही.

सिडको प्रशासनामार्फत आरोग्य विभागास त्वरीत जागा हस्तांतरीत करुन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत त्वरीत काम पूर्ण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(३) व (४) सिडको प्रशासनामार्फत आरोग्य विभागास जागा ताब्यात दिल्यानंतर उपलब्ध जागेतील १५६९ चौ.मी. जागा CRZ Mangrove Buffer Zone मध्ये जात असल्याचे निदर्शनास येऊन दिनांक १५ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेल्या नकाशाप्रमाणे १०० खाटांचे रुग्णालय व कर्मचारी निवासस्थानांचे बांधकाम उपलब्ध जागेमध्ये करणे शक्य नसल्याचे निदर्शनास आले. उपलब्ध जागेमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने IPHS (Indian Public Health Standards - २०२२) नुसार रुग्णालय इमारतीचे वास्तुशास्त्रीय आराखडे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत तयार करण्यात आले आहेत. तसेच अधिकारी / कर्मचारी यांची निवासस्थाने सद्य:स्थितीत उरण येथे सुरु असलेल्या रुग्णालयाच्या आवारात करण्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड - अलिबाग यांनी दिनांक ११ ऑगष्ट, २०२३ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले आहे.

उपलब्ध जागेच्या अनुषंगाने, सुधारित नकाशांनुसार १०० खाटांचे रुग्णालय व अधिकारी / कर्मचारी निवासस्थाने बांधकामासाठी अनुक्रमे रुपये ७५ कोटी व १७.६४ कोटी रकमेची दोन स्वतंत्र अंदाजपत्रके नव्याने प्रशासकीय मान्यतेसाठी दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागास सादर करण्यात आली आहेत. सदर कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

---

## दक्षिण मुंबईतील मराठी विकास संस्थेच्या कार्यालयास जागा उपलब्ध करुन देणेबाबत

**(१५) २२५३५ (२९-११-२०२३) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेची अभिवृद्धी करण्यासाठी मराठी विकास संस्थेची स्थापना दिनांक १ मे १९९२ रोजी करण्यात आली असून मराठीच्या भाषेच्या विकासासाठी विविध कार्यक्रम व स्वतंत्र उपक्रम राबविले जात असून त्याअंतर्गत चर्चासत्रे, भाषेविषयी उपक्रम, कोष व सूची व वाङ्‌मय इ. उपक्रम या संस्थेकडून राबविले जात असून मराठी भाषा आणि राज्याची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करणे हे या संस्थेचे काम असून या संस्थेकडे मराठीतील विविध ग्रंथसंपदाही आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या संस्थेला कायमस्वरुपी जागा देण्यात न आल्यामुळे दक्षिण मुंबईतील एल्फिस्टन तांत्रिक विद्यालयाच्या इमारतीत असलेले मराठी विकास संस्थेचे कार्यालय राज्य कौशल्य विकास विभागाने इतर ठिकाणी कायमस्वरूपी स्थलांतरित करण्याचे प्रयत्न केले असून मराठी विकास संस्थेच्या कार्यालयाचा कारभार इमारतीच्या जिन्याखाली स्थलांतरित केला जात असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य मराठी विकास संस्थेला एल्फिस्टन तांत्रिक विद्यालयाच्या पहिल्या मजल्यावर कायमस्वरूपी कार्यालय उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०५-१२-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग दिनांक ३०/०४/१९९२ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेस कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, धोबीतलाव, मुंबई येथे जागा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला आहे.

तद्नंतर राज्य मराठी विकास संस्थेस दैनंदिन कामासाठी सदर जागा अपुरी पडत असल्याने मा.मंत्री, मराठी भाषा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक ०३/०८/२०१७ रोजीच्या बैठकीत अतिरिक्त जागा उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय झाला. त्यास अनुसरुन मुख्याध्यापक, एलिफिस्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई यांनी दिनांक ०४/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये काही अटी व शर्तीसह राज्य मराठी विकास संस्थेस एक वर्गखोली ८ महिन्यांसाठी उसनवारी तत्वावर उपलब्ध करुन दिली. सदर अतिरिक्त वर्गखोलीमध्ये कौशल्य व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य विकास सोसायटी व राज्य मराठी विकास संस्थेच्या काही कर्मचाऱ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली होती.

तथापि, महाराष्ट्र राज्य विकास सोसायटी या कार्यालयाची कार्यकक्षा रुंदावल्याने व सदर कार्यालयास बैठक व्यवस्था अपुरी पडत असल्याने मुख्याध्यापक, एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई यांनी दिनांक २८/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये राज्य मराठी विकास संस्थेस उपलब्ध करुन दिलेल्या अतिरिक्त वर्गखोलीमधील कार्यालय सदर इमारतीच्या तळमजल्यावर जिन्याच्या बाजूला स्थलांतरीत करण्याबाबत कळविले होते. त्यास अनुसरुन अतिरिक्त वर्गखोलीतील राज्य मराठी विकास संस्थेची कपाटे तळमजल्यावर जिन्याशेजारी स्थलांतरीत करण्यात आली व कर्मचारी यांना संस्थेच्या मूळ कार्यालयात स्थलांतरीत करण्यात आले. सदर परिस्थितीत राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयाचा कारभार इमारतीच्या जिन्याखाली स्थलांतरित करण्याची बाब वस्तुस्थितीवर आधारीत नाही.
(३) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग दिनांक ३०/०४/१९९२ अन्वये राज्य मराठी विकास संस्थेस एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, धोबीतलाव, मुंबई येथे कायमस्वरुपी व्यवस्था होईपर्यंत जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील यवतमाळ जिल्हा परिषदेची शिक्षक भरतीसाठी बिंदू नामावली पूर्ण करण्याबाबत

**(१६) २२५३६ (०७-१२-२०२३) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जवळपास २२ जिल्हा परिषदांची बिंदू नामावली पूर्ण झाली असून यवतमाळ जिल्हा परिषदेची बिंदू नामावली अद्यापही पूर्ण झाली नाही त्यामुळे यवतमाळ जिल्हा परिषदेची शिक्षक भरतीची जाहिरात प्रसिध्द होणार नसल्याने येथील विद्यार्थी नाराजी व्यक्त करित असून, शिक्षक भरतीसाठी विद्यार्थ्यांनी आपले स्वप्रमाणपत्र पोर्टलवर नोंदणीकृत केले आहे तर दुसरीकडे मा. शालेय शिक्षण मंत्र्यांनी बिंदू नामावली पूर्ण झालेल्या जिल्ह्यांमध्ये शिक्षक भरती प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हा परिषदेची बिंदू नामावली तात्काळ पूर्ण करा असे निवेदन विद्यार्थी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, यवतमाळ, जिल्हा परिषद यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या अनुषंगाने यवतमाळ जिल्हा परिषदेची बिंदू नामावली पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही/ उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१३-१२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील ३४ जिल्हा परिषदांची बिंदुनामावली पूर्ण झाली आहे. यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळांची बिंदूनामावली पूर्ण झाली असून, उर्दू माध्यमाच्या बिंदुनामावलीमध्ये त्रूटी असल्याचे निदर्शनास आले आहे.

ज्या जिल्ह्यांची बिंदुनामावली पूर्ण झाली आहे, त्या जिल्ह्यांना पवित्र पार्टलवर जाहीरात देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) आंतरजिल्हा बदलीने यवतमाळ जिल्ह्यात आलेल्या उर्दू माध्यमाच्या खुल्या प्रवर्गाच्या शिक्षकांना सामावून घेण्यात आल्याने उर्दु माध्यमाची पदे अतिरिक्त झाली आहेत. सदर शिक्षकांना परत पाठविल्याशिवाय बिंदुनामावलीच्या प्रस्तावास मान्यता देण्यास मागासवर्गीय कक्ष, अमरावती यांचेकडून असमर्थता दर्शविली आहे. याअनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांनी याबाबत शासनास मार्गदर्शनपर प्रस्ताव सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याच्या मागणीसह अन्य प्रलंबित मागण्या पूर्व करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१७) २२६७२ (१४-१२-२०२३) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर : तारांकित प्रश्न क्रमांक १९८९० ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा अशी अनेक वर्षांपासूनची मागणी केंद्र शासनाकडे प्रलंबित असल्याने याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्याची विनंती मा.मुख्यमंत्री महोदयांनी गुजरात मधील गांधीनगर येथे झालेल्या पश्चिम क्षेत्रिय परिषदेच्या २६ व्या बैठकीत केंद्र शासनाकडे केली असल्याची बाब माहे ऑगस्ट २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा,दुष्काळग्रस्त भागातील पाण्याची समस्या नदीजोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड आणि कोकणातून समुद्रात वाहून जाणारे पाणी याचा योग्य वापर करण्यासाठी केंद्राने मदत करावी अशा व अन्य मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय. हे खरे आहे. पश्चिम क्षेत्रिय घाट परिषदेची २६ वी बैठक दिनांक २८/०८/२०२३ रोजी गांधीनगर, गुजरात येथे झाली. सदर बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी या विषयांबाबत केंद्राकडे मागणी केली असल्याचे आंतरराज्य परिषद सचिवालय, गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक ०९/११/२०२३ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तावरुन दिसून येते.

(३) मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याच्या अनुषंगाने मराठी भाषेमधील मूळ अहवाल दिनांक १२/०७/२०१३ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

सन २०२० च्या द्वितीय अर्थसंकल्पीय अधिवेशनात "मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी शिफारस करणारा" शासकीय ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये पारित करुन दिनांक २०/०४/२०२० च्या पत्रान्वये पुढील कार्यवाहीसाठी केंद्र शासनास अग्रेषित करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाबाबत सर्वच स्तरावरुन केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २४/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.पंतप्रधान महोदयांना मराठी भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत विनंती केली आहे. तसेच दिनांक १४/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री, संस्कृती मंत्रालय यांना याप्रकरणी विनंती केली आहे.

पश्चिम क्षेत्रिय परिषदेच्या २५ व्या बैठकीच्या कार्यपूर्ती अहवालामध्ये नमूद केल्यानुसार संस्कृती मंत्रालय, केंद्र शासन यांनी दिनांक १७/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये साहित्य अकादमीच्या अंतर्गत असलेल्या भाषा तज्ज्ञ समितीने एखाद्या भाषेस अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचे पुनर्निश्चित केलेले

निकष हे संस्कृती मंत्रालयाच्या विचाराधीन असल्याचे पश्चिम क्षेत्रिय परिषदेस कळविले आहे.

सचिव, मराठी भाषा विभाग यांच्या दिनांक ३०/०८/२०२३ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये सुधारीत निकष कळविण्याबाबत केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाकडे विनंती केली आहे.

मा.मुख्यमंत्री यांनी पश्चिम क्षेत्रिय विकास परिषदेच्या दिनांक २८/०८/२०२३ रोजी झालेल्या २६ व्या बैठकीमध्ये केलेल्या मागण्यांबाबत केंद्र शासनाकडून कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

जलसंपदा विभाग आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने त्यांच्याशी संबंधित मुद्यांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे,

शासन निर्णय, जलसंपदा विभाग, दिनांक १७/०९/२०१९ अन्वये प्राथमिक अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीने कोकणातील अतिरिक्त ८९.९२ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात व १०.७६ टीएमसी पाणी तापी खोऱ्यात वळविणेबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. तसेच वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाव्दारे ६२.५७ टीएमसी पाणी विदर्भासाठी वळविण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार मराठवाड्यासाठी दमणगंगा- वैतरणा-गोदावरी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी, पार- गोदावरी, मुंबई शहरासाठी दमणगंगा पिंजाळ व विदर्भाकरीता वैनगंगा-नळगंगा इत्यादी नदीजोड प्रस्तावित केले आहे. त्याद्वारे सुमारे १९४.८५ टीएमसी पाणी वळविण्याचे प्रस्तावित आहे.

मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांनी जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पास मान्यता देण्याची विनंती दिनांक १८/१०/२०२३ च्या पत्रान्वये मा.मंत्री, जलशक्ती मंत्रालय यांना केली आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या राष्ट्रीय जल जीवन मिशन पथकाने दिनांक ०२/११/२०२३ ते दिनांक ०४/११/२०२३ या कालावधी दरम्यान मुंबई येथे भेट देऊन प्रस्तावाची तपासणी व अधिकाऱ्यांसमवेत चर्चा केली आहे. त्यानंतर अद्याप केंद्र शासनाचे अंतिम आदेश वा सुचना प्राप्त झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कनिष्ठ अभियंता गट “ब” (अराजपत्रित) या पदासाठीच्या परिक्षेकरिता अभियांत्रिकी पदवीधारकांना पात्र ठरविण्याबाबत

**(१८) २२७०७ (०६-१२-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता गट “ब” (अराजपत्रित) या पदासाठी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करून पदभरती प्रक्रिया सुरू केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदासाठीची पात्रता फक्त पदविका (Diploma) ठेवल्यामुळे पदविका करून पदवी प्राप्त केलेले उमेदवार परीक्षा देण्यास पात्र ठरले असून सदरील निर्णयामुळे १२ वी + पदवीधर अभियंत्यांना अपात्र करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पदवीधारकांना परीक्षेसाठी पात्र ठरविण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१३-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील "कनिष्ठ अभियंता गट-ब (अराजपत्रित)" या पदासाठी दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक २६/१०/२०२३ च्या अधिसूचनेनुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या सुधारित सेवाप्रवेश नियमांनुसार स्थापत्य अभियांत्रिकीतील किमान पदविका किंवा पदवी अथवा त्यापेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेले उमेदवार सदर परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे जाहिरातीमध्ये दिनांक २७/१०/२०२३ रोजी पुरवणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वडगाव मावळ (जि.पुणे) येथील रस्त्याच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) २२७५१ (०६-१२-२०२३) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव मावळ (जि.पुणे) येथील सेवा रस्त्याच्या व कामशेत येथील व्ही.यु.पी. (वाहनांसाठी उपमार्ग) या दोन्ही कामांना सन २०१६ मध्ये मंजूरी देउन सदर कामाचे कार्यादेश निर्माण कन्स्ट्रकशन यांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठेकेदारांनी माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये रुपये ३,०५,१७,४७२/- चे काम पूर्ण केलेले असतानाही त्यांना रुपये १४,२६,४६,८२२/- चे देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठेकेदाराला रुपये ११,२१,२९,३५० इतक्या जादा रक्कमेचे देयक अदा करण्यात आले असून सदर कामांमध्ये गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदारांस जादा अदा करण्यात आलेल्या रकमेची व्याजासह वसुली करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांसह ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-१२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरण सध्या मा.उपलोकायुक्त यांचेकडे न्यायाधिन आहे. त्यांचे आदेशानुसार अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, याबाबत अंतिम निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वांद्रे व वरळी (मुंबई) येथील शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मालकी हक्काची घरे मिळणेबाबत

**(२०) २२७८३ (०८-१२-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे व वरळी (मुंबई) येथील शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना मालकी हक्काने घरे मिळणेबाबत गत १५ वर्षांपासून मागणी करूनही त्याबाबतचा निर्णय आजमितिपर्यंत अंतिम झाला नसल्याची बाब दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या मालकी हक्काच्या घरांबाबतचा निर्णय प्रलंबित असतानाही त्यांना घरे खाली करण्याच्या नोटिसा देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वांद्रे आणि वरळी येथील शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मालकी हक्काची घरे देण्याबाबत बैठक घेण्यात आली असून त्यामध्ये शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१३-१२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

वांद्रे शासकीय वसाहतीमधील इमारतीचे आर्युमान विचारात घेता संरचनात्मक परीक्षण करण्यात आल्यानंतर २२ इमारती मधील ११३ सदनिकांधारकांना सदनिका धोकादायक आढळल्याने सदनिकाधारकांची सुरक्षितता विचारात घेऊन या सदनिकाधारकांना सदनिका रिक्त करण्याबाबत सूचनापत्र देण्यात आलेले आहे. तसेच या सदनिकाधारकांना उपलब्धतेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत समकक्ष पर्यायी सदनिका उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यापैकी १० सदनिकाधारकांनी पर्यायी सदनिका स्वीकारल्या असून उर्वरीत सदनिकाधारकांनी सदनिका रिक्त केलेल्या नाहीत. वांद्रे येथे वर्ग-३ व ४ कर्मचाऱ्याच्या निवासस्थानांसाठी एकूण १२ इमारतींची कामे प्रगतीत असून त्यापैकी ३ इमारतींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सदर इमारतींमधील सदनिकांचे वाटप करण्यात येत आहे.
(३) वांद्रे येथील शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत दिनांक ११/१०/२०२३ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली आहे. सदर बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.